नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/१२/२०२५ (शनिवार )**

---

## नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५— मतमोजनी बंदोबस्त साठी नागपुर ग्रामीण पोलीस सज्ज
## मतमोजनी पार्श्वभुमीवर अवैध दारू काढणाऱ्यांवर कारवाई
## १६ लाख ८८ हजरांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २१/१२/२०२५ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील १३ पोलीस स्टेशन अंतर्गत सावनेर, कळमेश्वर, मोहपा, खापा, काटोल, नरखेड, कन्हान पिपरी, उमरेड, रामटेक, बोरी अशा एकुण ११ नगर परिषद तसेच मोवाड, कोंढाळी, कांद्री, मौदा, भिवापूर, पारशिवनी अशा एकुण ०५ नगरपंचायत बाबत मतमोजणी असुन संबधित मोजणीस्थळी मतमोजणी प्रक्रीया संपन्न होणार आहे. मतमोजनी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. यासाठी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

नगर परिषद /नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुक मतमोजणी २०२५ बंदोबस्ताकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी हे नमुद बंदोबस्तात आपआपल्या उपविभागात पर्यवेक्षण अधिकारी आणि संबधीत पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे बंदोबस्त प्रभारी अधिकारी म्हणुन नेमण्यात आले आहेत. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण यांनी मतमोजनी केंद्रे बंदोबस्त, पार्कीग बंदोबस्त, रोड बंदोबस्त तसेच राखीव बंदोबस्त असा बंदोबस्त लावला आला आहे. बंदोबस्तासाठी बाहेरून राज्य राखीव दलाचे ३ कंपनी आणि ७०० गृहरक्षक नेमण्यात आले आहे. सदर बंदोबस्तात उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह १६ पोलीस निरीक्षक, ४९ सपोनि/पोउपनि, ४४१ पोलीस

अंमलदार, ४८ वाहतुक पोलीस अंमलदार ७०० गृहरक्षक ,तसेच राज्य राखीव दलाचे ३ कंपनी, दंगा नियंत्रण पथक —०२ , जलद प्रतिसाद पथक (क्यु आर टी) पथक —०२ आणि या व्यतिरिक्त अधिक १० पथके नेमण्यात आली आहे. सर्व ६ उपविभागात पेट्रोलींग पथक नेमण्यात आले आहेत. नागपुर ग्रामीण जिल्हयातील सायबर पोलीस स्टेशन सह सर्व २१ पोलीस स्टेशन सोशल मिडीयावर लक्ष ठेवुन मॉनिटरींग करीत आहेत.

**अवैध दारू काढणाऱ्यांवर कारवाई :—** नगर परिषद /नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुक मतमोजणी २०२५ च्या पार्श्वभुमीवर दिनांक २०/१२/२०२५ रोजी रोजी स्थानिक गुन्हे शाखा व कळमेश्वर पोलीस यांनी संयुक्त कारवाई करत २ पोलीस निरीक्षक, ३ सहा पोलीस निरीक्षक, ३ पोलीस उपनिरीक्षक ,४७ पोलीस अंमलदार आणि २५ गृहरक्षक यांच्या पथकाने धाड टाकुन कळमेश्वर अंतर्गत गौंडखैरी पारधी बेडा येथे २० ठिकाणी अवैध दारू काढणाऱ्यांवर धाड टाकुन कारवाई करण्यात आली. सदर कारवाईत १) ३८४०० लिटर मोहाफुल सडवा. किंमत १३,३०००/—रुपये ,२) २३९० लिटर मोहाफुल दारू किंमत. २,३९,०००/—रुपये आणि ३) इतर साहित्य किंमत १,१९०० /—रुपये असा एकूण १६,८८,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक १९/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील मौजा खुरसापार मधील पांढुर्णा ते सावनेर रोड वर नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान बजाज **स्टार सिटी मोटार सायकल एम एच ४० ए जे ९१७६** हे दुचाकी वाहन मिळुन आले. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक **आरोपी नामे चंदन माणिक लांजेवार वय ५० वर्ष रा. सालई मोकसा**

**ता. परशिवणी हा मिळुन आला** .पोलीसांनी पंचासमक्ष होला हुक्का शिशा कंपनीचे २०० ग्रॅम चे ७० पाकीटे आणि बागबान  कंपनीचे ३० ग्रॅम चे २० पाकीटे असा एकुण १४.६ किलो प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती **२१,६५०**/—रूपये आणि **मोटार सायकल एम एच ४० ए जे ९१७६** किंमती ६०,०००/—रूपये असा एकुण **८१,६५०**/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०३ गुन्हे नोंद

दिनांक १९/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**१) पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी नामे अस्पाक ईकबाल शेख, वय २६ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड** हा ईतवारीपेठ येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.**२) पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत आरोपी नामे शुभम वसंता पारसे, रा.जयप्रकाश वार्ड रामटेक** हा गांधी वार्ड रामटेक येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आणि **३) पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत** आरोपी नामे अमित श्रीचंद गजभिये, वय २२ वर्ष, रा. भारकस, ता. हिंगणा, जि. नागपुर हा भारकस ऑक्सी मॅक्स कंपनी समोर अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **नमुद आरोपी हे सार्वजनिक ठिकाणी अंमलीपदार्थाचे सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांचेवर एनडीपीएस कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०२ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १९/१२/२०२५ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत  गुप्त बातमीदाराच्या माहीतीवरून पोलीस स्टेशन जलालखेडा आणि रामटेक यांनी

जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सटट्ापटट्ी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १७,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत मौजा जलालखेडा बस स्टॉप येथे **आरोपी नामे— राजेंद्र लक्ष्मण विंचूरकर, वय ५९ वर्ष, रा. मदना, ता. नरखेड, जि. नागपूर** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतानां मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी २००/— रूपयांचा मुद्देमाल केला आहे.तसेच पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत राखी तलाव रामटेक येथे **आरोपी नामे आशिष अशोक गोस्कुलवार, रा. आझाद वार्ड रामटेक** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्यानेताब्यातून सट्टापट्टी साहीत्य, एक मोबाईल फोन किंमती रोख रक्कम २०१०/—रू. असा एकुण १७,०१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद

दिनांक १९/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १४,९४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापूर येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ०२ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत १२८७० मिली देशी दारु, ८८ लीटर मोहाफुल दारू असा एकुण १४९४०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्द्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २०/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७१८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७१८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने